www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

●LOKRAKSHANAY ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-232 ● Wednesday, 31 January 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

अनमोल विचार

"प्रत्येक घरात मनुष्य जन्माला येतो पण कुठेतरी माणुसकी जन्म घेते."

लक्षवेधी

अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सरकारकडून सर्व निलंबित खासदारांचे निलंबन मागे

नवी दिल्ली : बुधवारी दि. 31 जानेवारी पासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनापूर्वी, हिवाळी अधिवेशनादरम्यान निलंबन करण्यात आलेल्या सर्व विरोधी खासदारांचे निलंबन मागे घेण्यात येणार आहे. प्रल्हाद जोशी म्हणाले, 'सर्व खासदारांचे निलंबन रद्द केले जाईल. मी लोकसभा आणि राज्यसभा सभापतींशी याबाबत चर्चा केली आहे. हे सभापतींच्या अधिकारक्षेत्रात आहे, त्यामुळे आम्ही संबंधित विशेषाधिकार समित्यांशी बोलून निलंबन रद्द करण्याबाबत विनंती केली आहे. यावर दोन्ही सभापतींचे एकमत झाले आहे. निलंबित खासदार उद्यापासून सभागृहात येऊ शकतात. लोकसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी, म्हणजेच 31 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने मंगळवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.

'थोडासा दबाव पडताच पलटले...'; राहुल गांधींचा नितीश कुमारांना खोचक टोला

नवी दिल्ली : बिहारमधील राजकीय घडामोडींमुळे इंडिया आघाडीला धक्का बसल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पहिल्यांदाच नितीश कुमार यांच्याबद्दल विधान केलं आहे. त्यांनी नाव न घेता बिहारच्या मुख्यमंत्र्यांवर जोरदार निशाणा साधला आहे. राहुल गांधी म्हणाले की, थोडासा दबाव पडताच त्यांनी (नितीश कुमार) यू-टर्न घेतला. पण दबाव का? कारण आम्ही जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे मांडत आहोत. भारत जोडो न्याय यात्रा बिहारमध्ये दाखल झाली आहे. राहुल गांधी म्हणाले की, 'अखिलेशजी यांचं भाषण सुरू असताना बघेलजी यांनी मला एक विनोद सांगितला. तुमच्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांबद्दल एक विनोद आहे.

'ही शेवटची संधी, देशात हुकूमशाही येईल, भाजपा...'; निवडणुकीपूर्वी खरगेंचा इशारा

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीबाबत आरोप-प्रत्यारोप सुरूच आहे. याच दरम्यान, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी अशी एक शंका व्यक्त केली आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुका लोकांसाठी लोकशाही वाचवण्याची शेवटची संधी असेल कारण भाजपाने आगामी निवडणुका जिंकल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी हुकूमशाही करू शकतात असं म्हणत खरगे यांनी भाजपा आणि आरएसएसपासून दूर राहण्याचं आवाहन केलं. ₹राजकारण्यांना नोटिसा पाठवल्या जात असून ईडी आणि आयकर विभाग हे राजकीय विरोधकांना चिरडण्याचे हत्यार बनलं आहे. लोकांना भाजपा आणि आरएसएसच्या विचारसरणीची माहिती व्हावी.

अरबी समुद्रात भारतीय नौदलाचे धाडस ; 24 तासांत 2 जहाजांची चाच्यांपासून केली सुटका

नवी दिल्ली : भारतीय नौदलाचे धाडस पुन्हा एकदा अरबी समुद्रात पाहायला मिळाले. अरबी समुद्रात २४ तासांत भारतीय नौदलाने दोन जहाजांना चाच्यांपासून वाचवले. एवढेच नाही तर नौदलाने एका जहाजातून 19 पाकिस्तानी क्रू मेंबर्सची तर दुसऱ्या इराणी जहाजातून 17 क्रू मेंबर्सची सुटका केल्याची कौतुकास्पद कामगिरी समोर आली आहे. भारतीय नौदलाने 28 आणि 29 जानेवारी रोजी अरबी समुद्रात दोन जहाजांचे अपहरण होण्यापासून वाचवले. एका वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, नौदलाची युद्धनौका आयएनएस सुमित्रा यांनी रविवारी प्रथम इराणी जहाज एफबी इराणचे अपहरण होण्यापासून वाचवले. यानंतर अरबी समुद्रातच विशेष ऑपरेशन राबवून अल नैमी नावाच्या जहाजाला सोमालियाच्या चाच्यांपासून वाचवण्यात आले. या कारवाईत भारतीय मरीन कमांडोनी भाग घेतला असल्याचे सांगण्यात येत आहे.

'मी हा असा आहे, पटत असेल तर ठेवा, नाहीतर...', बच्चू कडूंनी सत्ताधाऱ्यांना केलं लक्ष्य

मुंबई : मराठा आरक्षण आंदोलनात कधी मनोज जरांगे पाटील व सरकारमध्ये मध्यस्थी करताना तर कधी आंदोलकांच्या बाजूने मैदानात उतरलेले बच्चू कडू गेल्या काही काळापासून चर्चेत राहिले आहेत. शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर अनेकदा बच्चू कडूंनी आपल्याच सरकारविरोधात ठाम भूमिका घेतली आहे. आता पुन्हा एकदा बच्चू कडू याच कारणामुळे चर्चेत आले आहेत. अहमदनगरमध्ये माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करत आपल्याला सत्तेतून बाहेर काढलं तरी त्याची पर्वा नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. बच्चू कडू यांनी यावेळी पंतप्रधान आवास योजनेत दुजाभाव केला जात असल्याचा आरोप केला. पंतप्रधान आवास योजनेत शहरासाठी अडीच लाख व मागेल त्याला घर दिलं जातं. पण तीच योजना गावात अटी घालून फक्त सव्वा लाखात दिली जाते. हा अपमान आहे. आम्ही अशा फाटक्या घराला मोदींचं पोस्टर लावलं.

चक्क विद्यार्थी करताहेत मराठा सर्वेक्षण, शिक्षकांनी लावले कामाला

नागपूर : ऐन दहावी आणि बारावीच्या परीक्षा तोंडावर असताना सर्वेक्षण सुरू झाल्याने काही शाळांमध्ये बारावी आणि दहावीच्या सराव परीक्षांवर याचा परिणाम झाला आहे. अशातच आता मराठा सर्वेक्षणासाठी शिक्षकांनी चक्क विद्यार्थ्यांना कामाला लावल्याचा धक्कादायक प्रकार भंडारा जिल्ह्यात समोर आला आहे. या शिक्षकांवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. राज्यात सर्वत्र मराठा आरक्षणासाठी सर्वेक्षणाचं काम जोरात सुरू आहे. शिक्षकांना सर्वेक्षणाचे काम देण्यात आले आहे. शिक्षकांवर या कामाचा अतिरिक्त भार आल्याने त्यांनी हा भार विद्यार्थ्यांच्या खांद्यावर टाकल्याची धक्कादायक घटना लाखनी तालुक्यातील गोंडेगाव येथील असून या प्रकरणी मेंढे शिक्षकाचे नाव समोर आले असून शिक्षक आपल्या कामासाठी विद्यार्थ्यांना गावात फिरवत असल्याचा व्हिडीओ प्रसारित होत आहे. या संदर्भात जिल्हा परिषद शिक्षण सभापती रमेश पारधी यांना विचारले असताना त्यांनी शिक्षणाधिकारी यांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

ठाणे जिल्ह्यातच मनसेचा एकनाथ शिंदे गटाला धक्का; उपजिल्हाप्रमुखाचा जय महाराष्ट्र !

■मुंबई। यश सावंत,

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सगळेच पक्ष तयारीला लागलेत. त्यात इच्छुकांनी मतदारसंघात उभे राहण्यासाठी आपापला पर्याय शोधणे सुरू केले आहे. अलीकडच्या काळात प्रत्येक पक्षात पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडतोय. तसाच मनसेतही प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातच मनसेनं शिंदेच्या शिवसेनेला धक्का दिला आहे.

शिवसेना भिवंडी लोकसभा उपजिल्हाप्रमुख संतोष शिंदे यांनी त्यांच्या समर्थक पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांसह मनसेत प्रवेश केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा शिवतीर्थ निवासस्थानी पार पडला. या पक्षप्रवेशाला मनसे नेते बाळा नांदगावकर, अविनाश जाधव आणि पक्षाचे उपाध्यक्ष डी. के म्हात्रे हे उपस्थित होते. मागील काही काळापासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे सातत्याने पक्ष बैठका घेत निवडणुकीचा आढावा घेत आहेत. त्यात मनसे लोकसभा निवडणुकीत उमेदवार उभे करणार असल्याची माहिती आहे.

गेल्यावेळी मनसेने लोकसभा निवडणुकीत उमेदवार उभे न करता केवळ प्रचार केला होता. मात्र यंदा राज ठाकरे लोकसभेला मनसेचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी पक्षातील पदाधिकारी, नेत्यांसोबत चर्चा, बैठकांचा सिलसिला सुरू आहे. मनसेला मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे वगळता इतर ठिकाणी फारसे यश आल्याचे दिसत नाही. परंतु २०१९ नंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न राज ठाकरे यांचा आहे. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतची राज ठाकरे यांची जवळीक अनेकांच्या भूवया उंचावणारी आहे.

राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातील संबंध चांगले आहेत. अनेकदा हे दोन्ही एकमेकांना भेटत असतात. त्यात मनसे-शिवसेना युती होणार अशाही बातम्या येतात. ठाणे जिल्ह्यात मनसे मानणारा मोठा वर्ग आहे. पक्षाचा एकमेव आमदारही ठाणे जिल्ह्यातून निवडून आलेला आहे. मनसेला गेल्या निवडणुकीत भिवंडी, ठाणे याठिकाणी लाखोंनी मते पडली होती. त्यातच आता भिवंडी येथील शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मनसेत प्रवेश करत असल्याने पक्षाची ताकद वाढली आहे.

१० फेब्रुवारीपासून आमरण उपोषण; मनोज जरांगे पाटलांचा सरकारला पुन्हा अल्टिमेटम

■रायगड। भावना जैन,

सरकारने सगेसोयरे याबाबत अधिसूचना काढली त्याची तातडीने अंमलबजावणी करायला हवी. अद्याप प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाला नाही. सगेसोयरेबाबत १५ दिवसाच्या वेळेत त्याचे विशेष अधिवेशन बोलावून कायद्यात रुपांतर करावे.

तातडीने उद्यापासून अंमलबजावणी सुरू केली नाही तर १० फेब्रुवारीपासून मी पुन्हा अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे. या कायद्याची लवकर अंमलबजावणी केली नाही. कायदा टिकवण्याची जबाबदारी सरकारने पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाही, समिती कामही करत नाही अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत म्हटलं की, समिती काम करत नसल्याचे दिसते, नाईलाजास्तव सगेसोयरे या कायद्याची अंमलबजावणी करून ज्याची कुणबी नोंद मिळाली त्यांच्या सगेसोयऱ्यांना आणि कुटुंबाला प्रमाणपत्र वाटप होणे गरजेचे आहे. म्हणून या कायद्याची अंमलबजावणी व्हावी आणि हा कायदा मराठ्यांसाठी कायमस्वरुपाचा असावा यासाठी आमरण उपोषणाची रायगडच्या पायथ्याहून घोषणा करतोय. त्याचसोबत अंतरवालीसह महाराष्ट्रातील गुन्हे मागे घेण्याचं सांगितले होते. त्याठिकाणी तातडीने सरकारनं शब्द वापरला होता. तात्काळ याचा अर्थ काय? सरकारची भूमिका कळत नाही त्यामुळे१० फेब्रुवारीच्या आत सर्व गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी त्यांनी केली.

तसेच हैदराबादचे गॅझेट समितीने अद्याप स्वीकारले नाही. सगेसोयऱ्यांबाबत अद्याप अर्ज दाखल होऊनही प्रक्रिया सुरू केली नाही. मी साडेपाच वाजेपर्यंत माहिती घेतली. हैदराबादचे गॅझेट तातडीने स्वीकारून त्याला शासकीय नोंदीचा दर्जा दिला पाहिजे. १८८४ ची जणगणनाही समितीला द्यावी. १९०२ चा दस्तावेजही अद्याप घेतला नाही. सगेसोयरे याबाबत राजपत्रित अधिसूचना दिली ते टिकवणे सरकारची जबाबदारी आहे. सरकारमध्ये दोन भूमिका असल्याचे दिसते या सर्व मुद्द्यांसाठी १० तारखेपासून आमरण उपोषण सुरू होणार आहे. १५ दिवसांचा वेळ आहे. मराठा समाजाच्या फायद्यापुढे दुसरं काही सहन करू शकत नाही असा अल्टिमेटम मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला.

दरम्यान, घराघरातल्या मराठ्यांना आरक्षण दिल्याशिवाय मी एक पाऊलही मागे सरकणार नाही हा माझा शब्द आहे. मी आंदोलन थांबवले नाही. थांबवणारही नाही. दस्तावेज सापडो अथवा न सापडो त्यासाठी सगेसोयरे कायदा मोठा आहे. मुंबईला गेलेला लढा सर्वसामान्य गरजवंत मराठ्यांचा होता. सगेसोयरे याची व्याख्या जी वाटते ती अभ्यासकांनी २ लाईनमध्ये १५ दिवसांत कळवावी. प्रत्येकाला आरक्षण मिळाल्याशिवाय मी हटणार नाही. मराठ्यांनी एकजूट करावी. १५ दिवसांत मराठा आरक्षणासाठी सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी केल्याशिवाय मी शांत बसणार नाही असंही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

ओबीसी आरक्षणाला कोर्टात चॅलेंज करणार, जरांगेंचं आव्हान, कोर्टात भेटाच, लक्ष्मण हाकेंनी चॅलेंज स्वीकारलं

■मुंबई। विशाल पाटील

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारकडून मराठा आरक्षणासंबंधीचं राजपत्र काढण्यात आलं. ओबीसी अंतर्गत जात प्रमाणपत्र देण्यासाठी प्रचलित कार्यपद्धतीची नव्याने मांडणी करणारी प्रारूप अधिसूचना (अध्यादेश नव्हे) राज्य सरकारने जारी केली आहे. त्यानंतर राज्यात जरांगे विरुद्ध ओबीसी नेते हा संघर्ष टोकाला पोहोचला आहे. त्यातच आता मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी आरक्षणाला सुप्रीम कोर्टात चॅलेंज करू, असं वक्तव्य केलं आहे.

त्यानंतर हा वाद अजूनच चिघळला आहे. जरांगे यांच्या या वक्तव्यानंतर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी तिखट प्रतिक्रिया देत जरांगे यांना खुलं आव्हान दिलं आहे. मनोज जरांगे म्हणतात तुम्ही जर आमच्या आरक्षणाला विरोध कराल तर आम्हीही ओबीसी आरक्षण कोर्टामध्ये चॅलेंज करू आणि तुमचं आरक्षण घालवू.

याचाच अर्थ असा होतो की मनोज जरांगे यांना गोरगरीब मराठा पोरांचं काहीही पडलेलं नाही. तुम्हाला हजारो वर्षांपासून ज्यांचे मानवी हक्क अधिकार डावलले गेले त्या माणसाला संविधानाने समता प्रस्थापित करण्यासाठी जे प्रावधान करून ठेवलेले आहे. आरक्षणाच्या माध्यमातून या लोकांना जी प्रतिनिधित्वाची भाषा केली आहे नेमकी तीच जरांगे यांना संपवायची आहे. या आधुनिक काळात जरांगे यांचा ओबीसी आरक्षणाला विरोध आहे.

एका बाजूला ओबीसीमधूनच आरक्षण मागायचं आणि दुसऱ्या बाजूला ओबीसीचं आरक्षण संपवण्याची भाषा करायची. विरोधाभासी वक्तव्ये करणाऱ्या जरांगे यांची औकात नाही. आता जरांगे यांनी कोर्टात यावंच, अस थेट आव्हान लक्ष्मण हाके यांनी दिलं आहे. मनोज जरांगे यांनी डुप्लिकेटपणा करून सुप्रीम कोर्टाच्या जजमेंटचं उल्लंघन करत घुसखोरी केली आहे.

मागासवर्ग आयोगाकडून मराठा सर्वेक्षणाचा शुक्रवारी आढावा

■पुणे। अभिजित येरल्लू,

मराठा आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाचा महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांचा आढावा शुक्रवारी (२ फेब्रुवारी) मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ. ओमप्रकाश जाधव हे घेणार आहेत. सर्वेक्षणाचे कामकाज, येणाऱ्या अडचणी आणि झालेले काम याबाबतची माहिती या वेळी घेण्यात येणार आहे. राज्य सरकारने १३ नोव्हेंबर २०२३ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे मागासलपेण तपासण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून २३ जानेवारीपासून राज्यभरातील मराठा समाज, खुल्या प्रवगार्चे सर्वेक्षण घरोघरी जाऊन सुरू करण्यात आले आहे.

हे सर्वेक्षण ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, सुरूवातीचे दोन-तीन दिवस सर्वेक्षणाला असंख्य अडचणी आल्या होत्या. राज्यात एकाच वेळी सर्वेक्षणाची माहिती भरण्यात येत असल्याने तांत्रिक अडचणी येत होत्या. त्यावर आयोग, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (एनआयसी) यांच्या सहकायार्ने तांत्रिक अडचणी सोडविण्यात आल्या आहेत.

तरीदेखील काही ठिकाणी अद्याप अडचणी येत आहेत. त्यामुळे सर्वेक्षणाचे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण होणे शक्य नसल्याने मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे सदस्य डॉ. जाधव हे २ फेब्रुवारीला पुणे दौऱ्यावर येत आहेत.

उद्यान खात्यातील महिला कर्मचाऱ्याने किली मांजारो सर; फडकवला तिरंगा

■मुंबई। विशाल कारंडे,

मुंबई महानगरपालिच्या उद्यान खात्यामधील उद्यान विद्या सहाय्यक सीमा बापू माने यांनी २६ जानेवारी २०२४ रोजी आफ्रिका खंडामधील सर्वात उंच पर्वत माउंट किलीमांजारो सर करून तब्बल १९,३४१ फुट उंचीवर संविधानाची प्रस्तावना वाचली.

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून त्या संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा जगभर प्रसार करत आहेत. या मोहिमे आधी माने यांनी बेसिक आणि ऍडव्हान्स माउंटेनिअरींग कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

उद्यान अधिक्षक जितेंद्र परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सोलापूर मधील ३६० एक्सप्लोरर कंपनीमार्फत माने यांनी मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली असून भविष्यात माऊंट एव्हरेस्ट सहित उर्वरित पाचही खंडातील सर्वोच्च शिखरे पादाक्रांत करण्याचा त्यांचा निर्धार आहे. याआधी त्यांनी, हिमाचल प्रदेश मधील फ्रेंडशिप पीक, सिक्कीम मधील काब्रू डोम कॅम्प १ सर केले आहे. तसेच सह्याद्री मधील वजीर पिनॅकल, स्कॉटिश कडा, तैलाबैला, नवरा पिनॅकल, नवरी पिनॅकल, भैरवगड, हरिश्चंद्र गड, कळसूबाई, माहुली गड, व इतर अनेक गड सर केले आहेत. तसेच काश्मीर मधील अवघड तीन तलावांचा तारसार, मारसार आणि सुंदरसार लेक ट्रेक यशस्वीरीत्या पूर्ण केलेला आहे.

टीका करण्यापेक्षा कायदेशीर त्रुटी दाखवा!

■मुंबई। सचिन कदम,

बिनबुडाची टीका करण्यापेक्षा माज्या निर्णयातील कायदेशीर चूक दाखवून देण्याची धमक उद्धव ठाकरे किंवा जितेंद्र आव्हाडांमध्ये नाही. संजय राऊतांचा तर तो विषयच नाही, अशा शब्दांत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरे गटावर पलटवार केला आहे. पक्षांतरबंदी कायद्याच्या चिकित्सेसाठी नेमलेल्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्षपद नार्वेकरांना देण्यात आल्याने उद्धव ठाकरे, संजय राऊत, जितेंद्र आव्हाड आदी नेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे. नार्वेकरांची नियुक्ती ही लोकशाहीची हत्या असल्याची टीका ठाकरे यांनी केली. त्यावर नार्वेकरांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. नार्वेकर म्हणाले, बिनबुडाची टीका करण्यापेक्षा मी दिलेल्या निर्णयात काय कायदेशीर चूक आहे, हे दाखविण्याची धमक ठाकरे, आव्हाडांमध्ये नाही. पक्षांतर बंदीबाबतच्या समितीवर महाराष्ट्रातील व्यक्तीची नियुक्ती झाली याचा ठाकरे यांना आनंद व्हायला हवा होता. कदाचित ठाकरे यांना राज्याबद्दल अस्मिता नाही. त्यांचे माज्यावरील प्रेम जगजाहीर आहे. त्यामुळे त्यांच्या शुभेच्छांचा मी स्वीकार करतो, असेही नार्वेकर म्हणाले.

मुंबई पोलिसांनी फक्त 10 दिवसांत आवळल्या आरोपींच्या मुसक्या

■मुंबई। नितीन देवळेकर,

सांताक्रूझ येथे शस्त्रांचा धाक दाखवत एका सराफा व्यापाऱ्याला लुटण्यात आलं होतं. सराफा व्यापाऱ्याच्या घरात दिवसाढवळ्या टाकण्यात आलेल्या या दरोड्यात 1 कोटी 43 लाखांचे दागिने लुटण्यात आले होते. यानंतर वाकोला पोलिसांनी तपास सुरु केला होता. अखेर 10 दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून चोरीचा सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींमध्ये व्यापाऱ्याच्या एका नोकराचा समावेश आहे. त्यानेच इतर सहकाऱ्यांच्या मदतीने दरोडा टाकल्याचं चौकशीत उघड झालं आहे.

बालूसिंह परमार, महिपाल सिंह, लेरुलाल उर्फ लकी भिल, मांगीलाल भिल आणि कैलास भिल अशी आरोपींची नावं आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून दागिने आणि देशी बनावटीचं रिव्हॉल्वर जप्त केली आहे. 19 जानेवारीला नरेश सोलंकी यांच्या सांताक्रूझमधील निवासस्थानी सकाळी 10.30 वाजता दरोडा पडला होता.

पुण्यात 'स्पा'च्या नावाखाली आत वेगळेच चाळे, पोलिसांना खबर, दोन मुलींची सुटका

■पुणे। विशेष प्रतिनिधी,

चतुःशृंगी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बाणेर येथे एका स्पा सेंटरमध्ये सुरू असलेला वेश्या व्यवसाय गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने उघडकीस आणला. यामध्ये दोन मुलींची सुटका करण्यात आली असून, वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका महिलेला अटक केली आहे. सामाजिक सुरक्षा विभागाच्या पोलिस अंमलदार मनीषा पुकाळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिमरन ऊर्फ वैष्णवी दीपक पवार (वय ३७, रा. पिंपळेगुरव) आणि अन्य एकावर चतुःशृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता उघडकीस आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर म्हाळुंगे रस्त्यावरील दक्षिणमुखी स्पा आणि रॉयल हमाम अँड स्पा या ठिकाणी वेश्या व्यवसाय चालू असल्याची माहिती समाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाला मिळाली. त्यानुसार बनावट ग्राहक पाठवून त्याची खातरजमा करून छापा टाकण्यात आला. त्यानंतर तेथून दोन मुलींची सुटका करण्यात आली. चतुःशृंगी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामणी याचा तपास करीत आहेत. चतुःशृंगी पोलिस ठाण्याच्या हद्दीत याच आठवड्यात बालेवाडी येथील दोन हॉटेलमधील हाय प्रोफाइल सेक्स रॅकेट उघडकीस आणण्यात आले होते.

शिधावाटप दुकानातील तांदळाचा काळाबाजार करणारे तिघे अटकेत

■ठाणे। अनिकेत भंकाळ,

गोरगरिबांना शिधापत्रिकेवर देण्यात येणाऱ्या तांदळाचा काळाबाजार करणाऱ्या गोवंडीमधील एका शिधावाटप दुकानावर शिवाजी नगर पोलिसांनी सोमवारी कारवाई केली. पोलिसांनी दुकानदार आणि तांदूळ घेऊन जाणाऱ्या तिघांविरूद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. गोवंडीमधील शिवाजी नगर परिसरातील लोटस कॉलनी येथील शिधावाटप दुकान क्रमांक ४४/ई/४८ वर ही कारवाई करण्यात आली. या दुकानातून काही जण मोठ्या प्रमाणात तांदळाच्या गोण्या घेऊन एका मोटरगाडीत भरत असल्याचे एका महिलेने पाहिले. तिने तत्काळ याची माहिती शिधावाटप कार्यालयातील अधिकाऱ्यांना दिली. याबाबत माहिती मिळताच शिधावाटप अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तांदळाचा काळाबाजार करणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले. शिधावाटप अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनेची माहिती शिवाजी नगर पोलिसांना दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत शिधावाटप अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून तिघांना अटक केली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ फेब्रुवारीला पुणे दौऱ्यावर, शिवरायांच्या जन्मस्थळावर होणार नतमस्तक

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

लोकसभा निवडणुका तोंडावर पंतप्रधान नरेंद्र मोदी 19 फेब्रुवारी रोजी पुणे दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात मोदी शिवनेरी किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मस्थळावर नतमस्तक होणार आहे. पुणे एअरपोर्ट टर्मिनल आणि मेट्रोच्या मार्गिकेचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे. लोकसभा निवडणुका फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यसरकारकडुन विकास कामांचे उदघाटन आणि भुमिपूजनाचा धडका सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मागील दोन महिन्यात महाराष्ट्रात मुंबई, नाशिक आणि सोलापूरनंतर पुण्यातला चौथा दौरा आहे. मुंबईत अटल सेतूच्या लोकार्पण सोहळ्यासाठी पंतप्रधान मोदी मुंबईत आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३० हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आलं.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

झुंज छोट्या वाघरांची...

मार्जारकुळातील मोठे सभासद वगळता सुमारे अकरा प्रकारचे प्राणी आपल्याकडे आढळतात. ती सर्वच छोटी, एकांडी, अत्यंत लाजाळू अशी विविध प्रकारची वाघरे आहेत. विलक्षण सुंदर, रुबाबदार अशा ही वाघरे नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. त्यांचे संवर्धन गरजेचे आहे.

वाघ, चित्ते, बिबळे व सिंह हे मार्जारकुळातील मोठे सभासद वगळूनही, भारतीय उपखंडामध्ये मार्जारकूळ छोट्या व मध्यम आकाराच्या सभासदांच्या भरपूर वैविध्याने नटलेले आहे. असे सुमारे अकरा प्रकारचे प्राणी आपल्याकडे आढळतात. ही सर्वच-छोटी वाघरे, एकांड्या शिकारी करणारी, अत्यंत लाजाळू रीतीने आपल्या सवयींनुसार कालक्रमणा करणारी असल्यामुळे त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे खूप अवघड असतेच, पण त्यांचे दर्शनदेखील दैवदुर्लभ असते.

मात्र हे सर्वच सभासद विलक्षण सुंदर आणि रुबाबदार असतात. मुख्य म्हणजे, त्यांच्या अधिवासातील अन्नसाखळीच्या ती शिरोभागी असल्याने, ती धड राहिली तरच तिथल्या सृष्टीव्यवस्था तग धरून राहतात. पैकी काहींची आता अस्तित्वासाठीच झुंज सुरू झाल्याचे दिसते. त्यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण महामंडळासारखी स्वायत्त यंत्रणा आता सर्वाधिक गरजेची आहे.

सर्वाधिक संकटात आहे ते यातले 'कॅराकल' -मराठी नाव 'कलंदर'. कमी उंचीच्या टेकाडांवर अथवा वाळवंटी प्रदेशात जगण्यासाठी जुळवण झालेले वाघरू. राजस्थान, कच्छ, पंजाबच्या उत्तरेकडील भाग हे त्याचे अधिवास. सडपातळ, सुमारे सोळा किलो वजन. अंगावर तांबडी किरमिजी फर. ही वाघरे अविश्वसनीय रीतीने चपळ असतात. इतकी, की वाळवंटी ससे पळू लागताक्षणीच त्यांना कलंदरने पकडलेले असते. किंवा बचावासाठी पकुड्यांनी (सँडग्राऊझ) हवेत उड्डाण करताच ते उडी मारून त्यांना पकडू शकतात. आजमितीला भारतभरात जेमतेम पन्नास इतकीच या प्राण्यांची संख्या असावी. एखादी जात टिकायची असेल तर कमीत कमी एक हजार इतकी संख्या आवश्यक असते. आशियाई चित्त्यानंतर नामशेष होण्याची पुरेपूर शक्यता कलंदरची वर्तवली गेली आहे.

मध्य भारतात आणि पंजाबमध्ये तर अधिवास असूनही त्यांना गेली पन्नास वर्षे कुणीच पाहिलेले नाही. त्यांची संख्या कमी होण्याची मुख्य कारणे म्हणजे चोरटी शिकार आणि अवैध व्यापार हीच होती. पण गेल्या काही वर्षात तसे काहीच प्रकार घडलेले नसूनही अधिवास नष्ट होत गेल्याने त्यांच्यावर ही वेळ आली आहे. जंगलापेक्षा माळरानावर ते जास्त आढळत असल्याने, अशा जमिनींमध्ये कॅमेरा ट्रॅप लावून पाहणी करायला हवी, ते झालेले नाही.

झाडवाघरू/ढगाळ बिबट्या (Clouded leopard), सोनवाघरू (Golden cat) आणि झाडमांजर (Marbled cat) ही ईशान्येकडील राज्यांमध्ये आढळणारी गोंडस, सुंदर वाघरे. त्यांच्यापैकी झाडवाघरांची वृक्षांवर चढण्याची, वावरण्याची क्षमता इतर सर्वांपेक्षा जास्त असते. त्यांचे सुळेही वाघरांमध्ये सर्वात मोठे असतात. २०२१च्या 'आययूसीएन' अहवालात त्यांची जगभरात संख्या तीन हजार ७०० ते पाच हजार ५८० इतकीच उरली होती.

ईशान्येकडील सदाहरित, घनदाट पर्जन्यवनांमध्येच सोनवाघरुही (गोल्डन कॅट) सापडते. त्यांचे शरीर ठिपकेविरहित, सोनसळी लाल रंगाचे असते. गालावर मात्र गडद आणि फिके अशा दोन्ही प्रकारचे पट्टे असतात. सामान्यतः कलंदरपेक्षा ते चणीने थोराड असतात आणि त्यांची शेपटीही अधिक लांब असते. पिसोरी इ. छोटी हरणे आणि हरणांची लहान पिले हा त्यांचा सर्वसाधरण आहार असतो.

जरी ते सहजी झाडांवर चढू शकत असले, तरी त्यांचा अधिक सहज वावर हा जमिनीवर कोसळलेल्या मोठ्या खडकांदरम्यान नोंदला गेला आहे. झाडमांजर (Marbled cat) ही याच भागांमधली वाघरांची आणखी एक छोट्या चणीची, भित्री जमात. झुपकेदार लांब शेपूट आणि त्यावर तपकिरी मळकट रंगात असणारी सुरेख नक्षी, तीही काळ्या आणि गडद करड्या रंगांची हे या जातीचे वैशिष्ट्य.

ही जात संपूर्णपणे वृक्षनिवासी (arboreal) आहे. विश्रांती घेणारे पक्षी, खारी आणि अगदी कीटकदेखील झाडमांजरांचे भक्ष्य असतात. मोठे प्राणी मारण्यातील धोके वाढले, तशी तस्करांची नजर या सर्व वाघरांवर गेली. त्यांना मारून त्यांची मऊशार फर, कवट्या, हाडे, पंजे दात सर्वच अवयव वाघाचे म्हणून खपवले जात असतात. सांप्रत काळी मिझोराम राज्यातील चांफाई जिल्हा हा या वाघरांच्या सीमापार तस्करीचा हॉटस्पॉट गणला जातो.

मे २०२२ मध्ये एकाच धाडीत तिथे अनेक साप, कासवे, बीव्हर, जंगली मांजर इत्यादी ४६८ जातींचे प्राणी पोलिसांना सापडले होते. हा भाग म्यानमारलगत असल्याने सीमा सुरक्षा दले इथे खूप सक्रिय नाहीत. तियाउ नदी जिथे मिझोराम आणि म्यानमार यांना वेगळा करते, तिथले घनदाट जंगल त्यामुळेच अशा तस्करीला वरदान ठरते. इथे गस्त वाढवली गेलीच पाहिजे.

ALOE VERA FOR WEIGHT LOSS: 5 WAYS TO CONSUME IT TO SHED POUNDS

The long, spiky and prickly leaves of aloe vera plant store a powerful gel loaded with amazing nutrients that are useful for skin health, digestion, detoxification and weight loss. No wonder, aloe vera gel has been used for centuries to treat skin conditions and various disorders. Research has found that intake of aloe vera gel can aid in reducing body fat accumulation by stimulating energy expenditure. Aloe vera gel can also help prevent diet-induced obesity as per studies. With its laxative properties, aloe vera can help aid digestion and boosts metabolism. As per several studies, aloe vera extract is effective in increasing insulin sensitivity and reducing fasting blood glucose. "Aloe vera is a plant that is used extensively for various purposes. The sword like plant with prickly leaves is treasure trove of minerals and nutrients. It is enriched with vitamin A, B, C and E, which help boost skin health. It also contains of acemannan, which facilitates better nourishment of cells and release toxins. Aloe vera is also extensively used in many dietary and fitness supplements for its rich protein content. According to multiple studies, aloe vera has also been linked to promoting weight loss," says Rishika Meetu, Dietician, Bhatia Hospital, Mumbai.

HOW ALOE VERA HELPS IN WEIGHT LOSS

Rishika Meetu explains reasons why aloe vera is a safe bet for weight loss:

1. Aloe vera helps aid digestion : Aloe vera has laxative properties and when consumed in small quantities may aid in digestion. An unhealthy gut is generally linked to weight gain. A healthy digestive system translates to proper metabolism of food and an optimal expulsion of waste from the body that helps in losing weight.

2. Aloe Vera helps in improving and controlling blood sugar level : Aloe vera juice keeps the blood sugar level in check by stimulating the secretion of insulin. By preventing sudden rises and falls in blood sugar levels, aloe vera also helps to control food cravings and keeps hunger pangs away.

3. Combats water retention : Water retention is one of the main conditions that can lead to weight gain. Due to it being a laxative, aloe vera juice is ideal for fighting water weight. However, it is important to keep in mind that one should not over exceed the consumption of aloe vera juice.

4. Boosts metabolism : Aloe vera is said to help in boosting metabolism, which further enables the body to burn fat. Aloe vera's fat burning abilities are credited to the presence of vitamin B, which converts the fat stored in the body into energy and aids weight loss.

5. Helps detoxify the body : Aloe vera gel contains a complex carbohydrate known as acemannan, which facilitates the absorption of nutrients by the cells, nourishes them and helps detoxify them.

WAYS TO CONSUME ALOE VERA GEL FOR WEIGHT LOSS

The gel and leaves of the aloe vera plant can be consumed in a variety of recipes, including smoothies, soups, salsas, salads, and stir-fries. Always be sure to remove the latex layer. Dietitian Rishika shares

5 ways to consume aloe vera for weight loss:

1. Take aloe vera before your meal To lose weight, you should consume a spoonful of aloe vera juice about 14 minutes before every meal every day. By doing this, your weight will start reducing rapidly.

2. You can take aloe vera with vegetable juice You can also consume aloe vera juice by mixing it with vegetable juice. If you are not able to drink aloe vera juice easily because of its taste, you can eat it this way.

3. Aloe vera can be taken by mixing it with warm water You can also consume it by mixing a spoonful of aloe vera juice in a glass of warm water every morning on an empty stomach. This method is the best way to consume aloe vera to get most of its benefits.

4. Aloe vera can be taken by mixing it with honey You can also consume aloe vera juice by mixing it with honey to reduce weight. For this, mix a few drops of honey in aloe vera, making its taste better.

5. Consume aloe vera with lemon You can also mix a few drops of lemon juice in aloe vera juice for quicker and better results. However, it is associated with adverse side effects hence must be consumed in moderation as a part of healthy diet.

हेल्दी असूनही 'या' 3 सवयी ठरतात आरोग्यासाठी घातक, अजिबात करू नका या चूका



निरोगी आरोग्यासाठी चांगल्या सवयी देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत. कारण चांगल्या वाटत असलेल्या या सवयी शरीरासाठी घातक ठरत आहेत. दररोज वेळेवर झोपणे आणि उठणे, ताजी फळे आणि भाज्या खाणे, योगासने किंवा व्यायाम करणे या सवयी चांगल्या आरोग्याचे लक्षण असू शकतात. परंतु, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, काही आरोग्यदायी सवयी तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकतात कारण तुम्ही या सवयी चुकीच्या वेळी फॉलो करता. अशा आरोग्यदायी सवयींबद्दल ज्या एका छोट्याशा चुकीमुळे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

सतत पाणी पिणे

शरीरातील डिहायड्रेशन टाळण्यासाठी, लोकांना दिवसातून 8-10 ग्लास पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. मात्र यापेक्षा जास्त पाणी प्यायल्यास ते तुमच्यासाठी खूप हानिकारक ठरू शकते. जास्त पाणी प्यायल्याने मळमळ, उलट्या किंवा शरीरात सूज वाढणे यासारखी लक्षणे दिसू शकतात. या स्थितीला वॉटर टॉक्सिसिटी म्हणतात. यामुळे अस्वस्थता आणि मूड बदलू शकतात.

मिठाईऐवजी फळे खाणे

आपल्या देशात असा कोण असेल ज्याला जेवणानंतर मिठाई खायला आवडत नाही? गाजराचा हलवा असो की खीर, जेवणाच्या शेवटी थोडे गोड खाल्ल्याने लोकांचा मूड सुधारतो. त्याचबरोबर अनेकांना जेवणानंतर मिठाईऐवजी गोड फळे खायला आवडतात. पण, तज्ज्ञांच्या मते, जेवणानंतर फळे खाणे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. याचा तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो आणि पचनसंस्थेशी संबंधित समस्याही निर्माण होऊ शकतात.

सुकामेवा खाणे

सुकामेवा हा आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. स्नॅकिंगसाठी काजू, बदाम, अक्रोड आणि पिस्ता यांसारख्या ड्रायफ्रुट्सचे सेवन करणे खूप फायदेशीर मानले जाते. शरीरासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या हेल्दी फॅट्ससाठीही या ड्रायफ्रुट्सचे सेवन खूप फायदेशीर मानले जाते. त्यामुळे हिवाळ्यात ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने हाडे आणि सांध्याशी संबंधित समस्या कमी होतात. पण, जर तुम्ही लवकर किंवा मोठे फायदे मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात ड्रायफ्रुट्सचे सेवन केले तर ते फायद्याऐवजी नुकसानच करते. जास्त प्रमाणात ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने ॲलर्जी होऊ शकते.

गौतमी पाटीलला टक्कर देतेय 'ही' नवीन लावण्यवती!

लावणी हा महाराष्ट्रातील लोककलाकृती आहे. तमाशाचा एक भाग म्हणजे लावणी हे नृत्य. लवण म्हणजे सुंदर आणि या शब्दावरुनच आला लावणी. हे नृत्य श्रृंगार आणि भक्तीशी जोडलं गेलं आहे. गीत, नृत्य आणि अदाकारी यांचं त्रिवेणी संगम म्हणजे लावणी. महाराष्ट्रात लोकसंस्कृतीत लावणीला अतिशय महत्त्व आहे. राज्यात नावाजलेल्या लावणीवती आहे. पण गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात गौतमी पाटील हिची लावणी पाहून महाराष्ट्राला वेड लागलं आहे. तरदुसरीकडे गौतमी पाटील हिचं नृत्य हे लावणी नसून अश्लील डान्स असल्याची टीका तिच्यावर वारंवार झाली आहे. अशातच सोशल मीडियावर नव्या लावण्यवती एन्ट्री झाली आहे. या लावण्यवतीचं नृत्य पाहून चाहते घायाळ झाले आहेत.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम रोहित मानेच्या पत्नीने शेअर केले नव्या घरातील फोटो, कॅप्शनने वेधलं लक्ष

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय विनोदी कार्यक्रमातील सर्वच कलाकार प्रेक्षकांच्या अगदी जवळचे झाले आहेत. समीर चौघुले, वनिता खरात, नम्रता आवटे, गौरव मोरे यांच्यासह प्रत्येक कलाकाराने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

यामध्ये रोहित माने या कलाकारनेही आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांना खळखळून हसवलं आहे. काही दिवसांपूर्वीच रोहितचं मुंबईत घर घेण्याचं स्वप्न पूर्ण झालं. आता त्याची पत्नी श्रद्धा मानेने नव्या घरातील फोटो शेअर सुंदर पोस्ट केली आहे.

रोहित आणि पत्नी श्रद्धा मराठीतील रोमँटिक कपल आहे. दोघंही आता नव्या घरात शिफ्ट झाल्याने आनंदात आहेत. श्रद्धाने रोहितसोबतचे रोमँटिक फोटो शेअर केले आहेत. यासोबत तिने कॅप्शनमध्ये लिहिले,₹घर..शब्द खूप छोटा आहे पण त्याचं वजन खूप मोठं आहे. घराचं स्वप्न आपण एकत्र पाहिलं आणि ते एकत्र पूर्ण केलं. आज स्वतःच्या घरात फोटो काढताना फारच कमाल वाटत होतं. आईबाबांचेही खूप आभार..तुम्ही मला स्वप्न

बघायला शिकवली आणि ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमीच पाठीशी उभे राहिलात.₹

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमामुळे कलाकारांचं नशीबच पालटलं आहे. अनेकांचं मुंबईतील घराचं स्वप्न पूर्ण झालं आहे. तर काही कलाकारांना सिनेमाची लॉटरी लागली आहे. प्रसाद खांडेकरच्या 'एकदा येऊन तर बघा' सिनेमात रोहितनेही काम केलं. सातारच्या रोहित मानेने मुंबईत येऊन सर्वात मोठं स्वप्न पूर्ण केलं यामुळे सगळेच त्याच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.

HEALTH AND SPORTS

'ROHIT SHARMA'S CAPTAINCY CAUGHT WANTING...': EX-ENGLAND STAR BLAMES INDIA SKIPPER'S TACTICS FOR LOSS IN 1ST TEST

NEW DELHI: India had many chances to hold the first Test by the scruff of its neck and finish it. Their first innings with the bat where they could have taken the lead beyond England's reach and with the ball in the second innings when they had England 163 for 5, were the most prominent ones. But they couldn't capitalise on any of them. In their first innings, three players breached the 80-run mark but none of them converted that into a really big score. Almost all of India's batters got starts but most of them threw it away. Despite this, they managed to take a huge lead of 190 runs. On most occasions, that would be enough for an innings win. And looked quite possible when England lost captain Ben Stokes with still 27 more runs to make India bat again. But that is where the match started to go south for India. Ollie Pope and Ben Foakes started the England turnaround of the ages. Pope used reverse sweep like it seldom has been against England spinners while Foakes trusted his defence. The duo put together 112 runs for the sixth wicket before an Axar Patel delivery kept really low to rattle Foakes' stumps. Pope and Foakes batted really well, no questions about that but could India captain Rohit Sharma have done anything different to stop them? England were ahead by 85 runs when Foakes was dismissed towards the End of Day 3. With only four England wickets to take, the ball was still in India's court. One would back India chase a 150-200 total easily on a pitch where the odd ball was turning and keeping low but there was nothing that made batting long seem an impossible task.

'FELT MY TIME IN THIS WORLD IS UP...': RISHABH PANT OPENS UP ON HORRIFIC CAR ACCIDENT

NEW DELHI : Out of action for more than a year now, Rishabh Pant is set to make a comeback in IPL 2024. The wicketkeeper-batter fell victim to a bone-chilling car accident in December 2022 near Roorkee, Uttarakhand. The accident left Pant with a ligament tear in his right knee and two cuts on his forehead. Since that accident, he has been out of competitive cricket. Gearing up for his expected comeback, Pant was present at the Delhi Capitals table for the IPL 2024 auction, and also attended a DC camp in November. Recently, Pant opened up on his accident in a conversation with Star Sports. The 26-year-old revealed that he thought that his time in the world was up, and was lucky that it wasn't more serious. "First time in my life I felt like my time in this world is up. During the accident I was aware of the wounds, but I was lucky as it could have been even more serious. I was feeling that someone saved me. I asked the doctor how long will it take for me to recover, he said it would take 16-18 months. I knew I had to work hard to cut this recovery time," he said. Pant's absence has been sorely missed within the national team unit. India lost to Australia in the World Cup final, and a player of his calibre would have been pivotal in the middle order. Meanwhile, in Test cricket, India lost for the first time after taking a lead of more than 100 at home, crashing to a defeat against England. In his absence, KS Bharat has been donning the wicketkeeper role in Tests.

DEEPTI SHARMA SHARES SECOND SPOT WITH PAKISTAN'S SADIA IQBAL AMONG BOWLERS IN T20I RANKINGS

NEW DELHI : India's Deepti Sharma is now the joint second on the ICC Women's T20I rankings. Fellow teammate Renuka Singh also moved up to 10th spot on the list. Deepti's rise was largely due to South Africa spinner Nonkululeko Mlaba dropping three places from earlier second to fifth after one wicket from two games against Australia. Deepti is sharing the second spot with Pakistan's Sadia Iqbal. England's Sarah Glenn was at fourth after rising a rung. England spinner Sophie Ecclestone maintained a healthy lead at the top of the T20I rankings for bowlers. There was no change within the top 10 of the latest T20I rankings for all-rounders with Deepti retaining the fourth spot. Among batters, India's Smriti Mandhana remained at the fourth spot and is the only Indian in the top 10 list. Jemimah Rodrigues, Shafali Verma and Harmanpreet Kaur are unchanged at 13th, 16th and 17th rank respectively. Australia's Beth Mooney is placed at the first spot in the women's batters list. She overtook Tahila McGrath after her fabulous innings against South Africa. Beth Mooney has already registered two half-centuries in the T20I format at the start of 2024. Recently, she scored 72 runs in just 57 deliveries against South Africa in Canberra. Tahila McGrath is currently in the second spot on the list. She scored 24 and 23 runs in the two opening games of the T20I series against South Africa. South Africa skipper Laura Wolvaardt is on third rank and rose to a new career-high rating after her Player of the Match heroics in the second clash of the series.

YOGA ASANAS FOR LOWER BACK PAIN: 8 EXERCISES THAT BRING RELIEF

In an interview with HT Lifestyle, Himalayan Siddhaa Akshar, Founder of Akshar Yoga Kendraa, shared, "Yoga encourages proper posture, reducing strain on the back. Breathing exercises in Yoga improve oxygenation to muscles, aiding in relaxation and tension release. The practice also fosters body awareness, helping individuals identify and correct habits contributing to back pain." He insisted, "Regular Yoga can enhance overall well-being, reducing stress that often exacerbates back discomfort. While individual experiences vary, incorporating Yoga into a routine may contribute to a healthier, pain-free back over time. Yoga offers a range of asanas specifically designed to alleviate lower back pain, promoting flexibility, strength and overall well-being." He suggested the following Yoga asanas to ease lower back pain -

1. Child's Pose (Balasana): Start on hands and knees, then sit back on your heels with arms stretched forward. This gentle stretch helps release tension in the lower back.
2. Cat-Cow Stretch (Marjaryasana): Begin on hands and knees, alternating between arching and rounding your back. This movement improves spine flexibility and relieves lower back discomfort.
3. Downward-Facing Dog (Adho Mukha Svanasana): From hands and knees, lift hips toward the ceiling, forming an inverted V-shape. Strengthens the entire back and stretches the hamstrings, reducing lower back strain.
4. Cobra Pose (Bhujangasana): Lie on your stomach, hands under shoulders, and lift your chest while keeping the pelvis on the floor. Strengthens the lower back muscles and promotes flexibility.
5. Bridge Pose (Setu Bandhasana): Lie on your back, bend your knees, and lift your hips toward the ceiling. Strengthens the lower back, glutes, and hamstrings, reducing lower back pain.
6. Seated Forward Bend (Paschimottanasana): Sit with legs extended, hinge at the hips, and reach toward your toes. Promotes flexibility in the lower back and hamstrings.
7. Knees-to-Chest Pose (Apanasana): Lie on your back, bring knees to chest, and hug them with your arms. Gently stretches the lower back, providing relief from discomfort.
8. Standing Forward Bend (Padahasthasana): Stand with feet hip-width apart, hinge at the hips, and reach toward the floor. Stretches the entire back, hamstrings, and calves, reducing lower back pain..

SUPERFOOD EGGPLANT : BENEFITS OF BRINJAL

Eggplant, revered for its rich, glossy exterior and culinary versatility, stands as a distinctive member of the nightshade family. Scientifically known as Solanum melongena, this vegetable has woven itself into the tapestry of global cuisine, gracing tables from Asia to the Mediterranean. With its mild flavour and absorbent nature, eggplant serves as a culinary chameleon, seamlessly adapting to various cooking methods. Beyond its nutritional attributes, the eggplant's allure lies in its ability to elevate dishes, offering a unique and satisfying taste experience. Let's look at the 5 advantages of adding eggplant to your platter. High in antioxidants: Eggplants are bestowed with a robust arsenal of antioxidants, with nasunin taking centre stage. This compound diligently shields our cells from the detrimental effects of free radicals, oxidative stress, and inflammation. By integrating eggplant into your meals, you provide your body with a natural defence mechanism that helps combat ageing and reduces the risk of chronic diseases. Nourishing the heart: The heart benefits significantly from the nutritional profile of eggplant. Packed with fibre, potassium, vitamin C, and various B vitamins, this vegetable supports cardiovascular health on multiple fronts. Dietary fibre aids in lowering cholesterol levels, while potassium helps regulate blood pressure. The combined action of these elements contributes to a heart-friendly diet that reduces the risk of heart-related complications. Weight management synergy: If you're on a quest for weight management, consider the role of eggplant in your dietary strategy. Low in calories yet rich in fibre, eggplant promotes satiety, helping you feel full for longer periods. This satiating effect reduces overall calorie intake, making it a valuable ally in weight control efforts. The fibre content also supports optimal digestion and curbs overeating tendencies. Blood sugar balancing act: For individuals grappling with diabetes or those aiming for blood sugar control, eggplant emerges as a promising dietary component. Certain compounds in eggplant help regulate blood sugar levels by slowing down the absorption of glucose.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
● Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

सिडकोवरील जप्ती वॉरंटला न्यायालयाची मंजुरी; ७२२ कोटी वाढीव नुकसानभरपाई प्रकरण

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

वाघिवली येथील १५२ एकर भूसंपादनापोटी अलिबाग न्यायालयाने मुंदडा परिवारास ७२२ कोटी रुपये वाढीव नुकसानभरपाई मंजूर केल्याच्या प्रकरणात विधी विभागाचा निष्काळजीपणा सिडकोच्या चांगलाच अंगलट आला आहे. मंगळवारी सिडकोच्या वकिलांनी प्रकरण तहकूब करण्याची केलेली मागणी अलिबाग न्यायालयाने नामंजूर करून जप्ती वॉरंटच्या अर्जावर सुनावणी घेतली. यावेळी युक्तिवाद ऐकल्यानंतर सिडकोवर जप्ती आणण्याचा अर्जदार मुंदडा यांचा अर्ज न्यायालयाने मान्य करून जप्तीची कारवाई करण्याचे आदेश

दिले. मुंदडा परिवारास घोषित केलेले निवाडे रद्द करण्यासाठी सिडकोने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रीट याचिकेवर फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात सुनावणी होणार आहे.

अलिबाग न्यायालयाने वाढीव नुकसान भरपाईच्या प्रकरणात सिडकोविरोधात दाखल जप्तीच्या अर्जावर निर्णय दिल्याने सिडको अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे अलिबाग न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सिडको आता उच्च न्यायालयात धाव घेणार की सिडकोवर जप्तीची कारवाई होऊ नये म्हणून ७२२ कोटी रुपयांचा भरणा अलिबाग न्यायालयात करणार, याकडे नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. वाघिवली भूसंपादनाच्या वाढीव नुकसान भरपाई प्रकरणात अलिबाग न्यायालयात २३ जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीवेळी सिडकोच्या वकिलांनी निशाणी २५नुसार प्रकरण तहकूब करण्याची केलेली मागणी न्यायालयाने फेटाळली.

सिडकोच्या मागणीला अर्जदारांच्या (मुंदडाच्या) वकिलांनी तीव्र विरोध केल्यामुळे अलिबाग न्यायालयाने सिडकोच्या वकिलांनी केलेली मागणी नामंजूर करून हे प्रकरण ५ फेब्रुवारी रोजी पुढील आदेशासाठी तहकूब केल्याचे अलिबाग न्यायालयाच्या २३ जानेवारी रोजीच्या ऑनलाइन रोजनाम्यात नमूद करण्यात आले होते.

मराठा आरक्षण आंदोलनाचा जेएनपीए बंदराला फटका, कंटेनर न आल्याने निर्यातीची जहाजे बंदरात अडकली

■उरण। प्रतिनिधी,

मराठा आरक्षणासाठी नवी मुंबईसह सर्व मार्गांवरील कंटेनर वाहतूक बंद ठेवण्यात आल्याने बंदरातून निर्यातीसाठी जाणारी आठ मालवाहू जहाजे बारा तास अडकली होती. त्यामुळे या आंदोलनाचा फटका येथील जेएनपीए बंदरालाही बसला आहे.

वाहतूक विभागाने पळस्पे-पनवेल या ठिकाणाहून टी पॉईंट येथून गव्हाण टाकी मागार्ने पाम बीच येथून वाशी येथील मुक्कामी जाणार असल्याने पदयात्रेला अडथळा आणि वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून गुरुवारी (२५) सकाळपासूनच जेएनपीटी एनएच -४ बी या महामार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

त्यामुळे जेएनपीटी एनएच -४ बी या महामार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आल्यामुळे जेएनपीए बंदर परिसरातील विविध रस्त्यांवरील कंटेनर मालाची वाहतूक रोखून ठेवण्यात आली होती. यामुळे जेएनपीए बंदरापर्यंत निर्यात मालाची कंटेनर वाहने वेळेत न पोहचल्याने निर्यात मालाचे कंटेनर जहाजात चढविण्यातही १२ तासांहून अधिक विलंब झाला. या विलंबामुळे मात्र आठ मालवाहू जहाजेही बंदरातच खोळंबून राहिली होती.

बंदरातील निर्यात मालाची ने-आण प्रक्रिया काही काळ थांबल्यामुळे बंदरातील कामकाजावर परिणाम झाला होता. मात्र शनिवारपासून बंदरातील आयात -निर्यात मालवाहू जहाजांची हालचाल सुरळीतपणे सुरू झाली असल्याची माहिती जेएनपीएचे वाहतूक विभागाचे मुख्य व्यवस्थापक गिरीश थॉमस यांनी दिली. वाहतूक खोळंबल्याने बंदरात येणाऱ्या-जाणाऱ्या कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची गर्दी वाढली आहे. त्यामुळे मात्र बंदरावरील वाहतुकीचा ताणही वाढणार आहे, अशी माहिती जेएनपीएचे कामगार विश्वस्त रवींद्र पाटील यांनी दिली.

सहलीसाठी निघालेल्या शाळेच्या बसचा अपघात, भावाला सोडायला आलेल्या तरुणीचा मृत्यू

■वसई। प्रतिनिधी,

शालेय विद्यार्थ्यांना घेऊन सहलीसाठी निघालेल्या एका बसने दिलेल्या धडकेत १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. विरार पूर्वेच्या गोपचरपाडा येथे मंगळवारी सकाळी सातच्या सुमारात ही दुर्घटना घडली. सिद्धी फुटाणे असे या दुर्घटनेत मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी विरार येथील नरसिंह गोविंद वर्तक (एन जी व्ही) या शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल मुंबईत जाण्यासाठी निघाली होती. सिद्धी फुटाणे ही तरुणी आपल्या ५ वी मध्ये शिकणाऱ्या लहान भाऊ ओम याला बसमध्ये सोडण्यासाठी आली होती.

सर्व मुले बसमध्ये बसली आणि पालक आपल्या मुलांना निरोप देत होते. यावेळी चालक बस मागे घेत असताना सिद्धीला बसची धडक लागली. त्यात ती गंभीर जखमी झाली. तिला विरारच्या संजीवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सिद्धी फुटाणे या तरुणीचे वडील मुंबई पोलीस दलात आहेत. या घटनेमुळे शाळेवर शोककळा पसरली आहे. सहल रद्द करण्यात आली असून विरार पोलीस ठाण्यात बस चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

कल्याण मधील आरटीओ कार्यालयाचे कामकाज ठप्प, कर्मचारी मराठा नोंदी सर्वेक्षणाच्या कर्तव्यावर

■कल्याण। प्रतिनिधी,

येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील २७ पैकी १९ कर्मचारी मराठा, खुल्या प्रवगार्तील समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी महसूल विभागाने वेगवेगळ्या भागात नियुक्त केले आहेत. हे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने आपले मूळकाम सोडून उपप्रादेशिक कार्यालयातील कर्मचारी गेल्या आठवड्यापासून महसूल विभागाने दिलेल्या कामासाठी कर्तव्यावर जात असल्याने उपप्रादेशिक परिवहन विभागाचा कल्याण मधील कारभार ठप्प पडला आहे. कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागाचे कार्यक्षेत्र कल्याण, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ, शहापूर, मुरबाड आहे. या भागातून वाहन चालक, मालक आपल्या वाहनाचे नुतनीकरण, परवाना, नोंदणी पुस्तिका घेण्यासाठी, शिकाऊ वाहन प्रशिक्षणासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज फेऱ्या मारत आहेत. परंतु, कामे करण्यासाठी मंचका समोर कर्मचारी दिसत नसल्याने नागरिकांना कार्यालयातून माघारी परतावे लागत आहे. सात ते आठ कर्मचारी विविध खिडक्यांवर काम करताना दिसत आहेत. त्यांच्या समोर विविध प्रकारची कामे घेऊन वाहन चालक, रिक्षा चालकांची गर्दी असल्याचे दिसून येत आहे.

अनेक खिडक्यांवर लिपीक, अधीक्षक पदावर मोटार वाहन निरीक्षक काम करताना दिसत आहेत. खिडकीवर गर्दी नको म्हणून वाहन मालक, चालकांना कार्यालयात कर्मचारी संख्या कमी असल्याने ऑनलाईन माध्यमातून कामे करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांकडून वाहन मालकांना केल्या जात आहेत. कर्मचाऱ्यां अभावी आरटीओ कार्यालयात विविध प्रकारच्या कामांच्या नस्तींचे ढीग साचले आहेत. शहापूर, मुरबाड भागातून आलेल्या नागरिकांना आरटीओ कार्यालयात काम होत नसल्याने रिकाम्या हाताने परतावे लागते. आरटीओ कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय नको म्हणून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद साळवी स्वता विविध विभागात फिरून आहे त्या परिस्थितीत नागरिकांची कामे करून देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना करत आहेत. सर्वेक्षणासाठी गेलेला आरटीओतील कर्मचारी सर्वेक्षण करताना नागरिक सहकार्य करत नसल्याने त्रस्त आहे.

वातावरणातील वाढत्या गारव्याने मासळी गारठली

■उरण। प्रतिनिधी,

अनेक दिवसांपासून वातावरणात गारठा वाढला असून समुद्रातील तापमानही कमी झाल्याने खोल समुद्रातील मासळीही गारठल्याने ती तळाला गेली आहे. त्यामुळे मासळीची ४० टक्केपेक्षा अधिक आवक घटली आहे. परिणामी मासळीच्या दरातही वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे खवय्यांबरोबर मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत. या स्थितीत मासेमारीसाठी केलेला खर्चही वसूल होत नसल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

प्रत्येक बदलत्या वातावरणाचा मासेमारी व्यवसायावर परिणाम होतो. त्यानुसार सध्या वातावरणातील गारव्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी गेलेल्या बोटींना आवश्यक त्या प्रमाणात मासळी मिळत नसल्याने मच्छीमारांनी केलेला खर्चही निघत नसल्याने नुकसान सहन करावे लागत आहे यावर्षी थंडीचे प्रमाण वाढल्याने पुन्हा एकदा मच्छीमारांवर संकट आले आहे. खोल समुद्रातील मासेमारीच्या एका फेरीसाठी ३ ते साडेतीन लाख रुपयांचा खर्च येतो. मात्र सध्या मासळीचे प्रमाण कमी झाल्याने मच्छीमारांना मिळणारी ८ ते १० टनांची मासळी आता ३ पेक्षा कमी टनांवर आली आहे. त्यामुळे यासाठी करण्यात आलेला खर्चही निघत नाही. ही स्थिती काही दिवस राहील अशी माहिती मच्छीमारांनी दिली आहे.

विविध प्रजातींचे मासे मिळेनात

● समुद्रातील वाढते प्रदूषण आणि अनधिकृ तपणे सुरू असलेल्या बेसुमार मासेमारीच्या परिणामी समुद्रात मिळणारे अनेक प्रकारचे मासे गायब होऊ लागले आहेत. पापलेट, सुरमई, घोळ आणि इतर अनेक प्रजातीचे मासे मिळेनासे झाले आहेत.

● कोलंबी प्रकारात टायनी १०० रुपयांवरून २००, चैनी २०० वरून ३५०, सफेद कोलंबी १५० वरून २५० रु.

● मांदेली आणि बोंबील हे सर्वसामान्य खवय्यांच्या पसंतीचे व परवडणारे मासेही महाग झाले आहेत. त्याचा परिणाम मासळीच्या दरवाढीवर झाला आहे.

● विविध प्रकारच्या मासळीच्या प्रजातीच्या संरक्षणासाठी शासनाने समुद्रातील लहान माशांच्या मासेमारीला बंदी घातली आहे. मात्र तरीही अशा प्रकारच्या लहान माशांची मासेमारी केली जात आहे.

वातावरणातील गारठ्यामुळे उष्णतेच्या शोधात मासे समुद्राच्या तळाला जाऊ लागले आहेत. परिणामी मासळीची आवक घटली असून दर वाढले आहेत. मच्छीमारही आर्थिक संकटात सापडले आहेत.

ठाण्यात शुद्ध पाण्याच्या गुणवत्तेत घसरण पाणी गुणवत्ता प्रमाणात दोन टक्क्यांनी घट

■ठाणे। प्रतिनिधी,

महापालिका क्षेत्रात पाणी पुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या वितरण प्रणालीमधील पाण्याचे नमुने घेऊन त्याची गुणवत्ता तपासण्यात आली असून यामध्ये पाण्याचे ९३ टक्के नमुने पिण्यायोग्य तर, ७ टक्के नमुने पिण्याअयोग्य आढळून आलेले आहेत. २०२२ मध्ये केलेल्या तपासणीत पिण्यायोग्य पाण्याच्या गुणवत्तेचे प्रमाण ९५ टक्के इतके होते. परंतु गेल्यावर्षी म्हणजेच २०२३ मध्ये त्यात दोन टक्क्यांनी घसरण झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे ठाणेकरांना होणाऱ्या शुद्ध पाण्याची गुणवत्ता कमी होताना दिसून येत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २५ लाखांच्या घरात गेली आहे. महापालिकेकडून शहरात दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्षलीटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्षलीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे हे सर्वच स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे मानले जातात. या स्त्रोतामार्फत होणाऱ्या पाण्याचा पुरवठा शहरात करण्यासाठी ७८० किमी लांबीची वितरण व्यवस्था आहे. पाणी वितरण व्यवस्थेचे तीन भागात विभागणी करण्यात आली असून त्याद्वारे पुढे शहरातील ४४ विभागात पाणी पुरवठा करण्यात येतो. मुंबई महापालिकेकडून यापुर्वी प्रक्रियेविनाच पाण्याचा पुरवठा केला जात होता.

या पाण्याचा ज्या भागांमध्ये पुरवठा होत होता, त्या भागांमधील रहिवाशांमधून पालिकेवर टिका होऊ लागली होती. यानंतर ठाणे महापालिकेने मुंबई महापालिकेकडून प्रक्रिया केलेले पाणी घेण्यास सुरूवात केली आहे. यामुळे पाणी गुणवत्तेत सुधारणा होईल, अशी शक्यता वर्तविली जात होती. परंतु ठाणे शहरात पाण्याची गुणवत्ता सुधारण्याऐवजी त्यात घसरण झाल्याची बाब पर्यावरण अहवालातून पुढे आली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात पाणी पुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या वितरण प्रणालीमधील पाण्याचे नमुने घेऊन त्याची गुणवत्ता प्रशासनाकडून दरवर्षी तपासण्यात येते. त्याची पर्यावरण अहवालात नोंद करण्यात येते. यंदाच्या पर्यावरण अहवालातही तशी नोंद करण्यात आलेली आहे. २०२०-२१ या वर्षात पाण्याचे एकूण १४ हजार ३०५ नमुने तपासण्यात आले. यामध्ये १३ हजार ७५५ नमुने पिण्यायोग्य तर, ६२० नमुने पिण्या अयोग्य आढळून आले होते.

उरणमध्ये एनएमएमटीच्या ब्रेक डाऊन होणाऱ्या बसची संख्या वाढली, भर रस्त्यात बस बंद होत असल्याने प्रवासी त्रस्त

■उरण । प्रतिनिधी,

नवी मुंबई महानगरपालिकेच्या एनएमएमटीच्या उरण मार्गावरील बस ब्रेक डाऊन होऊन नादुरुस्त होण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. सोमवारी दुपारी साडेबारा वाजता करळ जासई मार्गावरील करळ पुलाखाली ३० क्रमांकाची बस बंद पडल्याने नवी मुंबईत जाणाऱ्या प्रवाशांना आपला प्रवास अर्धवट सोडावा लागला. अशाच प्रकारे मंगळवारी दास्तान फाटा येथे ही एक बस बंद पडली होती. उरणमध्ये अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याने प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

उरण ते नवी मुंबईतील मार्गावरील विद्यार्थी, महिला व चाकरमानी यांच्या प्रवासासाठी महत्वाच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या एनएमएमटीच्या बस सातत्याने बंद पडू लागल्या आहेत. या बसेस ऐनवेळी रस्त्यात बंद होत असल्याने प्रवासी त्रस्त झाले आहेत. नवी मुंबईत जाणाऱ्या इलेक्ट्रिक बस बंद पडत आहेत. यामध्ये भर पावसात इलेक्ट्रिक व साध्या बसही बंद पडण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. नवी मुंबई महानगर पालिकेच्या एनएमएमटी सेवेच्या बसेस उरणपर्यंत येत आहेत. यातील अनेक बस या पावसामुळे बंद पडू लागल्याने येथील प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. उरणच्या शहरी भागांसह पूर्व विभागातील नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या एनएमएनटी बस सेवा ही महत्वपूर्ण ठरली आहे. या सेवेमुळे येथील चाकरमानी, विद्यार्थी व व्यावसायिक यांना लाभ होऊ लागला आहे.

समाज कल्याण निरीक्षकानेच केला विनयभंग; गुन्हा दाखल, चौकशी सुरू

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक महेश अळकुटे (४०) यांनी एका ५३ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याची तक्रार ठाणेनगर पोलिस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. विशेष म्हणजे यातील पिडितेवर लैंगिक अत्याचार झाल्याने ती मनोधैर्य योजनेंतर्गत राज्य शासनाकडून मिळणाऱ्या मदतीसाठी अळकुटे यांच्याकडे गेली होती. त्याच दरम्यान, त्यांनी तिचा विनयभंग केल्याचा तिने आरोप केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार १५ जानेवारी २०२४ रोजी याप्रकरणी ३५४-अ आणि ५०६ या कलमान्वये हा गुन्हा ठाणेनगर पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. हा प्रकार जिल्हाधिकारी कार्यालयातील पाच मजल्यावरील समाज कल्याण निरीक्षक अळकुटे यांच्या कार्यालयात घडल्याचेही या पिडितेने आपल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे. याप्रकरणी चौकशी सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयकुमार देशमुख यांनी दिली.

व्क्रॉरीच्या स्फोटात एका कामगाराने प्राण गमावले, दोन जखमी

■पनवेल। प्रतिनिधी,

पनवेलमध्ये सर्वाधिक ८० हून जास्त खदाणी व क्वॉरी आहेत. कुंडेवहाळ गावातील क्वॉरीमध्ये सोमवारी दुपारी दोन वाजता झालेल्या सूरुंग स्फोटामध्ये क्वॉरीवर काम करणाऱ्या एका पोकलेन चालकाच्या पाठीवर स्फोटानंतर उडालेल्या मोठ्या दगडांचा मारा अंगावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर दोन कामगार जखमी झाले. या घटनेत जीव गमावलेल्या पोकलेन चालकाचे नाव अविनाश केशव कुजूर असे आहे. याबाबत पनवेल शहर पोलीसांनी क्वॉरीमध्ये सुरुंगाव्दारे स्फोट घडविणाऱ्या ५३ वर्षीय कुलामणी राऊत याच्याविरोधात गुन्हा नोंदविला

आहे. ७० ते ८० मीटर अंतरावर हे कामगार व पोकलेन चालक उभे असताना स्फोट केल्याने ही घटना घडली. ॲन्थोनी भोईर यांची कुंडेवहाळ गावात क्वॉरी आहे. १८ वर्षीय अंकीत शहा, कामावर देखरेख करणारे अंकुश निरगुडा तसेच पोकलेन चालक कजूर यांच्या अंगावर दुपारी दोन वाजता अचानक स्फोट झाल्याने दगड उडाले. हे तीघेही जखमी झाले. मात्र या दगडांचा मारा एवढा जबरदस्त होता की या माऱ्यामध्ये पोकलेन चालक कुजूर हा जागीच ठार झाला. त्याच्या पाठीवर उजव्या बाजूला मोठ्या दगडाचा फटका बसल्याने तो जागीच ठार झाला. याबाबत पनवेल शहर पोलीसांनी भारतीय दंड संहिता १८६०, ३०४ अ अंतर्गत रितसर तक्रार नोंदविली असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी दिली. पनवेलमधील व्क्रॉरीवरील स्फोटात सोमवारी एकाचा जीव गेल्यामुळे पनवेल व उरणमधील सर्वच खदाणी व व्क्रॉरी मालकांकडे सूरुंग स्फोट घडविणारे कामगार हे कुशल आहेत का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

डोंबिवलीत प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीची मित्राच्या मदतीने हत्या, आडिवलीतील विहिरीतील मृतदेहाची ओळख पटली

■डोंबिवली। प्रतिनिधी,

प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीची पत्नीने आपल्या मित्र आणि त्याच्या साथीदारांच्या मदतीने अतिशय क्रूरपणे गेल्या आठवड्यात हत्या केली. त्याचा मृतदेह आडिवली गावातील एका विहिरत अवजड दगड बांधून फेकून दिला. मृतदेहाची ओळख पटताच ही हत्या मयताच्या पत्नीने आपल्या मित्राच्या मदतीने केल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली. विहिरीत आढळलेला मृतदेह चंद्रप्रकाश लोवंशी यांचा होता. चंद्रप्रकाश यांच्या पत्नीने गेल्या आठवड्यात पती चंद्रप्रकाश बेपत्ता असल्याची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात केली होती. चंद्रप्रकाशचा मारेकरी सुमित राजेश विश्वकर्मा, रिता चंद्रप्रकाश लोवंशी यांना पोलिसांनी अटक केली आहे. रिता आणि सुमित यांचे लहानपणापासून प्रेमसंबंध होते. या प्रेमात चंद्रप्रकाशचा अडथळा येत होता.

त्यामुळे त्याला मारण्याचा कट मागील चार महिन्यांपासून रिता आणि सुमित करत होते, असे पोलिसांनी सांगितले. आडिवली येथील विद्याधर वझे यांना आपल्या विहिरीत मृतदेह असल्याचे आढळले. त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी हा मृतदेह चंद्रप्रकाश याचा असल्याची खात्री केली. पोलिसांनी चंद्रप्रकाशची पत्नी रिता हिची सखोल चौकशी केली. ती उडवाउडवीची उत्तरे देत होती. पोलिसांनी तिला विश्वासात घेऊन चौकशी केली. तिने आपण आपला प्रियकर सुमित याच्या सहकायार्ने आणि इतर दोन अल्पवयीन मुलांच्या साहाय्याने ही हत्या केल्याची कबुली दिली.

ठाणे जिल्हा कॅरम स्पर्धेत १५० स्पर्धकांचा सहभाग



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

ठाणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन यांनी ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनच्या संकुलनात दिनांक २७ व २८ जानेवारी २०२४ मध्ये कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेमध्ये संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील विविध स्तरातील स्पर्धकांनी भाग घेऊन आपले कौशल्य प्रदर्शित केले.

ठाणे जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत संपूर्ण ठाणे जिल्ह्यामधून महिला एकेरी व पुरुष एकेरी एकुण १५० स्पर्धकांनी भाग घेऊन ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडली सर्व विजेते, उपविजेते, उपांत्यफेरी विजेते यांना रोख रक्कम प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तसेच महिला एकेरी गट विजेती समृद्धी घाडीगावकर, मधुरा महेश देवले उपविजेती, चैताली अनंत सुवारे उप-उपविजेती तसेच पुरुष एकेरी गट विजेता झईद अहमद फारूकी अंसारी, उपविजेता मोहम्मद ओवेस अंसारी, १ ला उपविजेता दत्ता महादेव कदम, यांना चषक व पदके देऊन गौरवण्यात आले. प्रमुख पंच रमेश चव्हाण यांच्या देखरेखी खालील सदर सामने पार पडले. मान्यवर उपस्थिती ठाणे जिल्हा कॅरम संघटनेचे सचिव श्जितेंद्र दळवी , उपाध्यक्ष वीणा चव्हाण तसेच ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव हेमंत अनार्थे, सह खजिनदार अनंता कामथ, समिति सदस्य मोहन सोमवंशी, समिति सदस्य संतोष राणे व क्रीडा समन्वय श्राजीव साटम.

पार्टी करण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून मित्रांकडून तरूणाला बेदम मारहाण

■ठाणे। प्रतिनिधी,

पार्टी करण्यासाठी उसने पैसे दिले नाही म्हणून तरूणाला त्याच्या मित्रांनी बेदम मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात विकी डॅनियल, जॉकी डॅनियल आणि त्यांच्या एका सहकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळवा येथील शांतीनगर भागात मारहाण झालेला तरूण राहातो. त्याचे याच भागात राहाणारे जॉकी आणि विकी हे दोघे मित्र आहे. सोमवारी तरूण कामाहून घरी परतल्यानंतर त्याला जॉकी, विकी आणि त्यांचा एक सहकारी भेटला. त्यावेळी विकीने तरूणाकडून पार्टी करण्यासाठी उसने पैशांची मागणी केली. परंतु पैसे नसल्याचे तरूणाने सांगितले असता, जॉकीने त्याला शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. त्यानंतर विकी याने तरूणाच्या डोक्यात लाकडी बांबूने प्रहार करत बेदम मारहाण केली.

तरूणाच्या डोक्यातून रक्तस्त्राव येऊ लागल्यानंतर तिघांनी तेथून पळ काढला. घटनेची माहिती कळवा पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी आले. तरूणाला उपचारासाठी महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार झाल्यानंतर तरूणाने याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाढीव मालमत्ता काराविरोधात तालूका प्रकल्पग्रस्त समितीचे महाधरणे आंदोलन

■पनवेल। प्रतिनिधी,

पनवेल महानगरपालिकेमार्फत जाचक आणि वाढीव मालमत्ता काराविरोधात पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून दि.30 रोजी महाधरणे आंदोलन पुकारत पालिकेमार्फत लादला जाणारा वाढीव मालमत्ता कर कमी करण्याची मागणी करण्यात आली.

उद्योजकांचे 268 कोटी माफ केले जात असतील तर सर्व सामान्य नागरिकांना वेगळा न्याय का ? असा सवाल उपस्थित करीत पालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली. या मोर्चात पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील 29 गावातील ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी पार्किंग आणि पॅसेज मधील कर रद्द करा, पालिकेचा झिजिया रद्द करा आदी प्रकारचे फलक झळकविण्यात आले. यावेळी शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील देखील या मोर्चात सहभागी झाले. यावेळी समितीच्या शिष्टमंडळने पालिका प्रशासनाला निवेदन देखील सादर केले.

फसवणूक करून पाच महिलांशी लग्न करणे महागात पडले; आरोपीला अटकेपासून संरक्षण देण्यास उच्च न्यायालयाचा नकार

■मुंबई। प्रतिनिधी,

पाच महिलांशी लग्न करून त्यांची फसवणूक केल्याच्या आरोप असलेल्याला उच्च न्यायालयाने अटकेपासून दिलासा देण्यास नकार दिला. आरोपीने एकापेक्षा अधिक महिलांशी लग्न करून त्यांची फसवणूक केल्याचे दाखवणारे पुरेसे उपलब्ध आहेत. त्यामुळे, त्याला अटकेपासून दिलासा देण्याचे ठोस कारण दिसून येत नाही, असे सकृतदर्शनी निरीक्षण नोंदवून न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या एकलपीठाने याचिकाकर्त्याची अटकपूर्व जामीन देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली. पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्यांचा विचार करता, आरोपीने केवळ एकापेक्षा अधिक लग्नच केलेली नाही, तर त्याला दोन मुले असल्याचेही उघड झाले आहे. मुलांच्या जन्मदाखल्यानुसार, मुलांच्या माता वेगळ्या असल्या तरी वडील एकच म्हणजे याचिकाकर्ता असल्याची बाबही न्यायालयाने त्याला दिलासा नाकारताना अधोरेखीत केली. याचिकाकर्त्याने तक्रारदार महिलेची फसवणूक केल्याचे पुराव्यावरून सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याचेही न्यायालयाने त्याची फेटाळताना नमूद केले.

तक्रारदार महिलेच्या तक्रारीवरून गेल्यावर्षी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी अटकपूर्व जामीन देण्याच्या मागणीसाठी याचिकाकर्ता शांतीलाल खरात याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार, आरोपीची तक्रारदार महिलेशी एप्रिल २०२२ मध्ये विवाह संकेतस्थळावर ओळख झाली होती. त्यानंतर दोनच महिन्यांनी त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर आरोपीने तक्रारदाराकडे आर्थिक मदत मागितली आणि तिने त्याला सात लाख रुपयांसह दागिनेही दिले. ते गहाण ठेवून त्याने ३२ लाखांचे कर्ज घेतल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पुढे आरोपीचे सहकाऱ्यासोबत प्रेमसंबंध असल्याचा तक्रारदार महिलेला संशय आला आणि ती जानेवारी २०२३ मध्ये घर सोडून माहेरी रहायला गेली. आरोपीबाबत चौकशी केली असता त्याचे याआधी चार वेळा लग्न झाल्याचे, तसेच पहिल्या पत्नीचे निधन झाल्याची माहिती तक्रारदार महिलेला मिळाली. आपली फसवणूक झाल्याचे कळताच तक्रारदार महिलेने पोलिसांत तक्रार नोंदवली. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे आरोपीविरोधात फसवणूक, द्विभार्या कायद्यासह भारतीय दंड संहितेच्या विविध तरतुदींनुसार गुन्हा नोंदवला. पहिल्या पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर फक्त तक्रारदार महिलेशी विवाह केल्याचा दावा आरोपीच्या वतीने वकील डॉ. समर्थ करमरकर यांनी केला. दुसरीकडे, आरोपीने इतर महिलांशी विवाह केल्याचे पुरावे न्यायालयात सादर करून सरकारी वकिलांनी याचिकाकर्त्याच्या याचिकेला विरोध केला. न्यायालयाने, पोलिसांचे म्हणणे मान्य करून याचिकाकर्त्याला अटकेपासून अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला.

सिद्धिविनायकाचे दर्शन होणार सुलभ, सुविधा वाढविण्यासाठी मुंबई महापालिकेचा विशेष प्रकल्प

■मुंबई। प्रतिनिधी,

प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरात भाविकांना वाढीव सुविधा देण्यासाठी मुंबई महापालिका विशेष प्रकल्प राबविणार आहे. मंदिराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात येणार असून, पूजा साहित्य विक्रेत्यांचे गाडगीळ मार्गावर स्थलांतर प्रस्तावित आहे. दादर रेल्वे स्थानक पश्चिम ते सिद्धिविनायक मंदिरादरम्यान दर ५ मिनिटांना 'बेस्ट'तर्फे मिनी बस सुरू करण्यात येणार आहे. पालिकेच्या दादर जी उत्तर व वरळी जी दक्षिण विभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या सिद्धिविनायक मंदिरात मुंबईसह देशभरातील भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांना अधिकाधिक सुलभरित्या दर्शन व्हावे, यासाठी पालिकेने विशेष प्रकल्प हाती घेण्याचे ठरवले आहे. सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष व आमदार सदा सरवणकर, पालिकेच्या वतीने उप आयुक्त (परिमंडळ २) रमाकांत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पात भाविकांना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र रस्ता, रस्ते रुंदीकरण, मंदिराच्या दोन्ही मार्गावर प्रवेशद्वार, अत्याधुनिक स्वच्छतागृह आदी सुविधांचा समोवश असेल. मंदिरात येणाऱ्या भाविकांना उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा मिळाव्यात, यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. यासाठी पालिकेमार्फत 'स्वारस्याची अभिव्यक्ती' मागवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार/वास्तुशास्त्रज्ञ यांची निवड करण्यात येणार आहे. प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार / वास्तुशास्त्रज्ञ यांनी दिलेल्या अहवालावर सदा सरवणकर आणि रमाकांत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली जी उत्तर आणि जी दक्षिण या दोन्ही विभागांचे सहायक आयुक्त, पालिका वास्तुविशारद त्याचप्रमाणे प्रमुख अभियंता (विकास नियोजन), प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक), नगर उप अभियंता (इमारत बांधकाम शहर) या विभागांचे अधिकारी या प्रकल्पाचे कामकाज पाहणार आहेत.

२२ हजारहून अधिक दहशतवाद्यांची माहिती संकलित! 'एनआयए'चा नवा डेटाबेस कार्यान्वित

■मुंबई। प्रतिनिधी,

देशभरात तसेच परदेशात सक्रिय असलेल्या २२ हजारहून अधिक दहशतवाद्यांची माहिती राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) संकलित केली आहे. दहशतवाद्यांविरुद्ध देशात दाखल झालेल्या हजारो गुन्ह्यांची माहितीही एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमेरिकेने तयार केलेल्या ह्यग्लोबल टेररिझम डेटाबेसह्नच्या धर्तीवर राष्ट्रीय दहशतवाद माहिती संकलन आणि विश्लेषण केंद्राची (एमटीडीसी-फॅक) स्थापना करण्यात आली आहे.

२००८ मध्ये मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय तपास यंत्रणेलाच आता दहशतवादी कारवायांबाबत गुप्तचर विभागाकडून माहिती दिली जात आहे. त्यामुळे विविध राज्यांतील दहशतवादविरोधी पथकांना स्वतंत्रपणे स्रोत उभा करावा लागत आहे. दहशवाद्यांविरोधात कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या राष्ट्रीय तपास यंत्रणेने आता तब्बल १५ वर्षांनंतर असा डेटाबेस तयार केला आहे. एका अतिवरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, इंडियन मुजाहीद्दीन, लष्कर-ए-तय्यबा या प्रमुख संघटनांसह देशात बंदी असलेल्या सर्व दहशतवादी संघटनांची माहितीही त्यांच्या म्होरक्यांसह उपलब्ध करुन दिली आहे. गेल्या वर्षात राष्ट्रीय तपास यंत्रणेने जोरदार कारवाई करीत तब्बल ६२५ दहशतवाद्यांना अटक केली आहे. या शिवाय आतापर्यंत दहशतवादी कारवायांमध्ये गुंतलेल्या सर्वच दहशतवाद्यांची माहिती आणि त्यांच्या संघटनेचे नाव, बोटांचे ठसे, ध्वनिचित्रफित, छायाचित्रे तसेच समाजमाध्यमांवरील प्रोफाईल आदी सर्वच तपशील संकलित करण्यात आल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले. राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे दहशतवादी कारवायांशी संबंधित असलेल्या ९२ लाख संशियतांच्या बोटांचे ठसे आहेत. याशिवाय अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या पाच लाखांहून अधिक आरोपींची माहितीही त्यांच्या अलीकडील छायाचित्रांसह संकलित करण्यात आली आहे.

खारघरमध्ये राष्ट्रीय वारकरी अखंड हरिनाम सप्ताह, देशभरातून हजारो वारकऱ्यांचा सहभाग

■पनवेल। प्रतिनिधी,

खारघर येथे ४ ते १२ फेब्रुवारी या दरम्यान संत शिरोमणी श्री निवृत्ती महाराज जन्म सप्त शतकोत्तरी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित राष्ट्रीय वारकरी अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्रीमद् भागवत कथा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याच ठिकाणी महाराष्ट्र भूषण सोहळ्यासाठी लाखो दासभक्त खारघरमध्ये आले होते. त्यानंतर देशभरातून गायत्री परिवाराचे भक्तांनी याच ठिकाणी अश्वमेध यज्ञ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला होता. त्यानंतर आताखारघर उपनगर शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र येथे सतत होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यांमुळे शहराची ओळख अध्यात्मिकतेची शिकवण देणारी वसाहत अशी होत आहे. आठवड्याभराच्या या सोहळ्यासाठी देशातील तीन पीठांचे आचार्य, शंकराचार्य, संतांचे वंशज, वारकरी संस्थांचे पदाधिकारी, ज्येष्ठ कीर्तनकार, वारकऱ्यांसह राज्यातून हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याचा दावा आध्यात्मिक विचार प्रचारक सामाजिक संस्थेने केला आहे. या कार्यक्रमादरम्यान अखंड हरिनाम सप्ताह होणार आहे. पहाटे चार ते सकाळी दहा या वेळेत काकड आरती, हरिकीर्तन, पाच हजार ज्ञानेश्वरी वाचक, टाळकरी, तीन हजार मृदंग वादक आणि हजारो श्रोतृवृंद उपस्थित राहणार आहे.

व्हिडीओ कॉल अन् महिलेच्या नावावर १९ लाखांचे कर्ज

■पिंपरी। प्रतिनिधी,

तैवानला पाठविलेले पार्सल मुंबईत नार्कोटिक्स विभागाने पकडले आहे. त्याची पडताळणी करण्यासाठी नार्कोटिक्स विभागाला फोन जोडल्याचे सांगून महिलेला स्काईपवरून व्हिडीओ कॉल करण्यात आला. महिलेला बँकेचे उपयोजन चालू करण्यास सांगितले. त्याद्वारे महिलेच्या नकळत १९ लाखाचे कर्ज मंजूर करून ती रक्कम वळती करून घेत फसवणूक केली. महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मोबाईल धारक आकाश कुमार, अमनी कोंडाल, कर्ज वळती करून घेतलेले बँक खातेधारक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेला आकाश नावाच्या व्यक्तीने फोन करुन तैवानमध्ये पाठवलेले पार्सल मुंबई येथील नाकोर्टीक्स विभागामध्ये अडकले असल्याचे सांगितले. फोन नार्कोटिक्स विभागाला जोडत असल्याचे सांगून महिलेचे बँक खाते तपासायचे आहे, असे सांगितले.

महिलेला स्काईपवरून व्हिडिओ कॉल करून त्यांची कागदपत्रे व बँक खात्याची माहिती घेतली. महिलेला बँकेचे उपयोजन उघडायला लावून त्यांच्या नकळत १९ लाख ४ हजार रुपयांचे वैयक्तिक कर्ज काढले. पैसे महिलेच्या खात्यावर येताच त्यांनी बेनिफिशरी बँक खात्यावर वळती करून घेतले.

वाहतुकीचा नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचा परवाना होतोय रद्द

■पुणे। प्रतिनिधी,

शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे. वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.

गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते. परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते.

२०२३ मध्ये शहरातील परवाना निलंबन

सिग्नल तोडणे : २२२

वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे : १५३

अतिवेगाने वाहन चालविणे : १७०

ख्वाजा युनुस कोठडी मृत्यू प्रकरणात माफीचा साक्षीदार होऊ द्या; सचिन वाझे यांची विशेष न्यायालयाकडे मागणी

■मुंबई। प्रतिनिधी,

घाटकोपर बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी ख्वाजा युनूस याच्या कथित कोठडी मृत्यूप्रकरणी माफीचा साक्षीदार होऊ देण्याची मागणी करणारा अर्ज बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी सोमवारी विशेष न्यायालयात केला. वाझे यांच्यासह चार पोलिसांवर या प्रकरणी खटला दाखल करण्यात आला आहे.

मात्र, या प्रकरणात आपल्याला कधीही अटक करण्यात आलेली नाही, असा दावा करून वाझे यांनी माफीचा साक्षीदार होऊ देण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. या कथित कोठडी मृत्यू प्रकरणात आपला सहभाग असल्याचे किंवा युनुसच्या मृतदेहाची ओळख पटल्याचे पोलिसांनी कुठेही म्हटलेले नाही. त्यामुळे. या प्रकरणी माफीचा साक्षीदार म्हणून आपले म्हणणे नोंदवून घ्यावे, अशी विनंती वाझे यांनी न्यायालयाकडे केली आहे. तसेच, या प्रकरणातील गुन्ह्याशी संबंधित तथ्ये उघड करण्याचे म्हटले आहे.

गेल्या २० वर्षापासून हे प्रकरण प्रलंबित असून त्याचा आपल्याला त्रास सहन करावा लागत आहे. हा केवळ कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापरच नाही, तर त्यामुळे आपल्या उपजीविकेसह समाजातील प्रतिमा आणि प्रतिष्ठेला हानी पोहोचत आहे, असा दावाही वाझे यांनी केला आहे. या प्रकरणाचा महत्त्वाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित असून त्याचा निकाल नजीकच्या काळात येण्याची शक्यता नाही.

त्याचप्रमाणे, नजीकच्या काळात हा खटला पुन्हा सुरू होईल असेही नाही आणि खटला निकाली निघण्यास बरीच वर्षे लागतील, असा दावा वाझे यांनी माफीचा साक्षीदार होण्याची मागणी करताना केला आहे. आपल्याला सहन कराव्या लागणाऱ्या वेदना अंतहीन आहेत, असेही वाझे यांनी अर्जात म्हटले आहे.

'एअर इंडिया' वसाहतीतील कर्मचाऱ्यांना तात्पुरता दिलासा; पाडकाम तूर्त नाही; विमानतळ प्राधिकरणाची न्यायालयात हमी

■मुंबई। प्रतिनिधी,

कलिना येथील एअर इंडियाच्या वसाहतीतील रिकाम्या इमारतींवरील पाडकाम कारवाई पुढील सुनावणीपर्यंत करणार नाही, अशी हमी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनीने नुकतीच उच्च न्यायालयात दिली. कर्मचाऱ्यांच्या याचिकेवर तातडीने घेतलेल्या सुनावणीच्या वेळी कंपनीने ही हमी दिली. या प्रकरणी मंगळवारी सुनावणी होणार आहे.

कंपनीतर्फे वसाहतीतील २० इमारती गेल्या आठवड्यात पाडण्यात आल्या. मात्र, या इमारतीच्या संलग्न इमारतीला धोका निर्माण झाल्याने इमारतीमधील रहिवाशांनी त्याला प्रचंड विरोध केला. त्यानंतर मोठ्या पोलीस बंदोबस्तात पाडकाम करण्यात आले. यामुळे, एअर इंडिया स्टाफ कॉलनी असोसिएशनने अंतरिम दिलासा मिळावा म्हणून आधी शहर दिवाणी आणि सत्र न्यायालयात धाव घेतली. तिथे काहीच दिलासा न मिळाल्याने असोसिएशनने उच्च न्यायालयात धाव घेतली.

त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती आर. एन. लढ्ढा यांच्या एकलपीठाने तातडीची सुनावणी घेतली. त्यावेळी, पाडकाम कारवाई पुढील आदेशापर्यंत न करण्याची हमी कंपनीतर्फे न्यायालयाला दिली. तिची दखल घेऊन न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी ३० जानेवारी रोजी ठेवली.

कर्मचाऱ्यांच्या सेवा निवासस्थानाची १८४ एकर जमीन एअर इंडियाच्या खासगीकरण कराराचा भाग नसून ती सरकारी मालकीच्या मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली आहे, असे कंपनीतर्फे उपरोक्त हमी देण्यापूर्वी न्यायालयाला सांगण्यात आले. कंपनीच्या दाव्यानुसार, मुंबई विमानतळाजवळील एअर इंडिया वसाहतीमधील २० इमारती मागील आठवड्यात बुधवारी पाडण्यात आल्या. या सर्व इमारती निर्जन व जीर्ण अवस्थेत होत्या. या इमारती पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या संबंधित विभागाकडून घेण्यात आल्या होत्या. एअर इंडियाच्या पीएसयू मालमत्ता होल्डिंग कंपनी एआयएएचएलने हे हस्तांतरण केले आहे.

टाटा वीज कंपनीचा दरवाढीचा प्रस्ताव; छोट्या घरगुती ग्राहकांवर अधिक भार

■मुंबई। प्रतिनिधी,

टाटा वीज कंपनीने १ एप्रिलपासून वीजदरवाढ करण्याचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाला सादर केला आहे.

हा प्रस्ताव मान्य झाल्यास छोट्या घरगुती ग्राहकांना जास्त भार सहन करावा लागेल. २०२२-२३ आणि २३-२४ या आर्थिक वर्षांसाठी आयोगाने मंजूर केलेले दर आणि प्रत्यक्षात मिळालेला महसूल याचा आधार घेत तूट भरून काढण्यासाठी टाटा कंपनीने हा प्रस्ताव दिला आहे.

दरमहा सुमारे ३०० किंवा ५०० युनिटपर्यंत वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांना बिले पाठविणे आणि ती वसूल करणे, हे काम कठीण असते. या पार्श्वभूमीवर ०-१०० युनिटसाठी तब्बल २०१ टक्के वाढ प्रस्तावित असून १०० ते ३०० युनिटपर्यंत ६० टक्के व ३०१ ते ५०० युनिटपर्यंत १० टक्के वाढीचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव मान्य झाल्यास टाटा कंपनीचे ५०० युनिटपर्यंतचे दर अदानींच्या कंपनीपेक्षा अधिक असतील. त्यामुळे ग्राहक अदानींकडे परतण्याची शक्यता आहे.

सध्याचे वीजदर

युनिट	अदानी	टाटा	बेस्ट
०-१००	३.१५	४.९६	१.८७
१०१-३००	५.४०	६.९७	५.४६
३०१-५००	७.१०	८.४०	९.५६
५०१ पेक्षा अधिक	८.१५	७.९४	११.७३

उपनगरात दोन गावठी बंदुका, तीन जिवंत काडतुसे जप्त, तिघांना अटक

■नाशिक। प्रतिनिधी,

दोन गावठी बंदुका आणि तीन जिवंत काडतुसे बाळगल्याच्या प्रकरणात उपनगर परिसरातील समता नगरातील तिघांना पोलिसांनी अटक केली. नाशिक-पुणे मार्गावरील इच्छामणी लॉन्स भागातील मैदानावर ही कारवाई करण्यात आली. यातील एक सराईत गुन्हेगार आहे. संशयितांनी गावठी बंदुका कुठून मिळवल्या, ते बाळगण्याचे प्रयोजन काय, याची छाननी तपास यंत्रणेकडून करण्यात येत आहे. शुभम जाधव (२३), सचिन सोनवणे (२४, दोघेही सोनवणे बाबा चौक, समतानगर आणि गणेश भालेराव उर्फ बॉबी (२४), सिध्दार्थ किराणा जवळ, समतानगर अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. इच्छामणी लॉन्स लगतच्या मैदानावर एक जण गावठी बंदूक आणि काडतूस घेऊन येणार असल्याची माहिती उपनगर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकातील शिपाई जयंत शिंदे यांना मिळाली. त्यानंतर निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या निर्देशानुसार सहायक निरीक्षक चौधरी, शिपाई जयंत आणि अनिल शिंदे यांच्या पथकाने सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक गावठी बंदूक, एक जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले. न्यायालयाने संशयितांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. तपासात गणेश भालेराव या आणखी एका साथीदाराची माहिती मिळाली. पथकाने भालेरावच्या घराची झडती घेतली. त्याच्याकडून एक गावठी बंदूक, दोन जिवंत काडसे हस्तगत केली. उपनगर पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित शुभम जाधव हा नोंदीतील गुन्हेगार आहे. संशयितांनी शस्त्रे कुठून मिळवले, त्याचे कुठे वितरण केले जाणार होते का, याची छाननी केली जाणार असल्याचे सपकाळे यांनी सांगितले. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत यांनी शहरातील गुंड प्रवृत्ती व दहशत पसवणाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेऊन संबंधितांविरोधात कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

छत्रपतींच्या किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश होणार? भारत सरकारचा युनोस्कोला प्रस्ताव

■मुंबई। प्रतिनिधी,

युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईटमध्ये समावेश होण्यासाठी प्रत्येक देशाकडून नामांकने पाठवली जात असतात. यंदा भारताकडून युनेस्कोकडे मराठा रणभूमीचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी युनेस्को हेरीटेज लिस्ट २०२४-२५ करिता केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने यंदा मराठा रणभूमीला नामांकन दिलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, राजगड, शिवनेरी, तोरणा, लोहगड, साल्हेर, मुल्हेर, रांगणा, अंकाई-टंकाई, कासा, सिंधुदुर्ग, अलिबाग, सुवर्णदुर्ग आणि खांदेरी किल्ल्यांचा समावेश आहे. तसेच तामिळनाडूतील जिंजीचा किल्ल्याचा ही समावेश आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवरुन माहिती दिली आहे.

काय म्हणाले मुख्यमंत्री शिंदे

शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप!

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या आणि रयतेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी भक्कम गड किल्ल्यांची बांधणी करून सक्षम राज्य निर्माण केले. हे गडकिल्ले स्वराज्याची शान आणि महाराष्ट्राच्या समृद्धीचे द्योतक आहेत.

गेली अनेक शतके ताठ मानेने उभे असलेल्या या गड किल्ल्यांवर ऐतिहासिक वारशाची मोहोर उमटवण्याचा प्रयत्न सुरू असून महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूच्या जिंजी किल्ल्याला युनेस्को वर्ल्ड हेरिटेज लिस्ट २०२४-२५ मध्ये नामांकन मिळाले आहे. साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील शिववारशाला जागतिक ओळख मिळू शकणार आहे.

युनेस्कोच्या प्रतिष्ठित व्यासपीठावर महाराष्ट्राला नामांकन मिळणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. महाराष्ट्रातील गड किल्ल्यांना नामांकन मिळाल्याने पहिली पायरी सर झाली आहे. या किल्ल्यांना असलेला शौर्य, पराक्रम आणि रयतेच्या कल्याणाचा वारसा आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, त्यावर अंतिम मोहोरही उमटेल, अशी मला खात्री वाटते.

छत्रपती शिवाजी महाराज की जय!

जय जिजाऊ, जय शिवराय!

जय महाराष्ट्र!